महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र.९/कॅम्प पुणे
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दिनांक : **२२/०३/२०२०**

# परिपत्रक

**विषय : करोना विषाणू (COVID-19) रोगाचा प्रसार टाळण्यासाठी कृतीशिल उपाय.**

**संदर्भ :** १) शासन निर्णय क्र. एमआयएस-०९१९/प्र.क्र.२२६/विशा-४ दि. १६.०३.२०२०.
२) परिपत्रक क्र. मासं/रवका/न.क्र.९/७५८१ दि. ०५.०३.२०२०.
३) परिपत्रक क्र. मासं/रवका/न.क्र.९/८५५९ दि. १७.०३.२०२०.
४) परिपत्रक क्र. मासं/रवका/न.क्र.९/८७४९ दि. १८.०३.२०२०.
५) शासन निर्णय क्र. समय -२०२०/प्र.क्र.३५/१८ (र. व का.) दि. २०.०३.२०२०.
६) परिपत्रक क्र. मासं/रवका/न.क्र.९/८९२९ दि. २०.०३.२०२०.

महाराष्ट्र राज्यामध्ये करोना विषाणूचा (COVID-१९) वाढता प्रसार विचारात घेता व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महावितरण कंपनीमध्ये कृतीशिल उपाय म्हणून सर्व प्रशासकीय कार्यालयातील नियंत्रण अधिकारी, कंपनीच्या दैनंदिन कामकाजास व संचलन कार्यक्षमतेस (Operational Efficiency) कुठेही बाधा येणार नाही, याची खबरदारी घेऊन त्यांच्या कार्यालयात कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांपैकी इतर महाराष्ट्रात ५०% व मुंबई महानगर प्रादेशिक विकास क्षेत्र, पुणे, पिंपरी-चिंचवड आणि नागपूर शहर कर्मचाऱ्यांना २५% उपस्थिती अनिवार्य केली होती, उर्वरीत कर्मचाऱ्यांना दि. ३१.०३.२०२० पर्यंत **"घरून काम (Work From Home)"** करण्यास संदर्भित क्र.४ व ६ मधील परिपत्रकान्वये सूचना देण्यात आल्या होत्या.

२. आता, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेच्या माध्यमातून कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी तसेच राज्यामध्ये जमाव बंदी लागु होत असल्याने / झाल्याने अधिक तातडीची उपाययोजना म्हणून शासकीय आदेशान्वये महावितरण कंपनीमध्ये प्रशासकीय कार्यालयातील अधिकारी / कर्मचाऱ्यांची दैनंदिन उपस्थिती **५ टक्के** ठेवण्यात यावी. या करीता कंपनीच्या संबंधित कार्यालय प्रमुख यांनी तातडीने आवश्यक ती उपाययोजना करावी.

३. तथापी, सर्व सक्षम अधिकारी यांनी कोणत्याही परिस्थितीमध्ये विद्युत पुरवठा सुरळीत / अखंडीत ठेवणेकरीता व ब्रेकडाऊन झाल्यास त्याचा तातडीने निपटारा होण्याकरीता आवश्यक कर्मचारी कामावर बोलावण्यास हरकत नाही. जो कर्मचारी कामावर असेल / कामावर बोलावला जाणार असेल त्याने कंपनीचे ओळखपत्र सोबत ठेवणे अनिवार्य राहील.

४. सदर परिपत्रक निर्गमित केल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.

५. सदर परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**(कमांडर शिवाजी इंद्रलकर) (से.नि.)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

Scanned with CamScanner